स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 29–02–2016** रोजी **सकाळी 11–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

<u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. राजू भाऊरावजी नागूलवार | सदस्य |
| 7. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 10. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 11. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 12. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 13. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

<u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 2. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 3. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |

<u>उपस्थित अधिकारी</u>

**1.** श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
**2.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 698</u>:– प्रभाग क्र. 40 ब अंतर्गत गंजीपेठ गणेश चौक ते भालदारपुरा मस्जिदकडे जाणाऱ्या नाल्याचे पुनर्निर्माण करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 49,97,723/– रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 618 व नवीन पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 699</u>:– प्रभाग क्र. 4 अ औलिया मस्जीद ते पि.एम.एस. शाळेपर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त १४ निविदांपैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा २५.८७ प्रतिशत ने कमी दरांची रू. २४,५८,९८८/– (अक्षरी चौवीस लक्ष अठ्ठावण्णव हजार नऊशे अठ्याऐंशी रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 700</u>:– नागपूर शहराला युरोपियन युनियन (EU) प्रायोजित ''इक्वी सिटी'' प्रकल्पासाठी झालेल्या सांमजस्य करारला स्थायी समितीची माहितीस्तव सादर.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (A.I.I.L.S.G.) मुंबई यांच्या व मा. आयुक्त मनपा यांच्यात झालेले सांमजस्य करार दि. 18.02.2016.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (A.I.I.L.S.G.) मुंबई व मनपा यांच्यात ''इक्वी सिटी'' प्रकल्पासाठी सांमजस्य करार दि. 18.02.2016 ला झाले आहे. ''इक्वी सिटी'' या प्रकल्पाचे ठळक वैशिष्टे व उद्दिष्टे खालील प्रमाणे आहे.

सदर प्रकल्प हा युरोपियन युनियन प्रायोजित आहे. प्रकल्पाची प्रकल्प राशी रु. 3 कोटी 75 लक्ष एवढी असून या प्रकल्पाला 100 टक्के निधी युरोपियन युनियन कडून प्राप्त होणार असल्यामुळे मनपाला कोणताही आर्थिक भार सहन करावा लागणार नाही. सदर प्रकल्पाचा कालावधी 2 वर्ष आहे. या प्रकल्पांतर्गत मनपा मध्ये राबविण्यात येणारे प्रकल्पा अन्वये समान नागरिक सुविधा पुरविण्यास मदत होणार आहे. तसेच त्याच्या गुणवत्तामध्ये भर पडणार आहे. सदर प्रकल्पामध्ये पायाभूत स्तरावरुन क्षमता बांधणी करण्यासाठी मनपाला मदत करण्यास्तव शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेले स्टेक होल्डरांशी समन्वय साधून त्यांचा सहभाग लाभणार आहे.

मा. आयुक्त यांच्या निर्देशान्वये ''इक्वी सिटी'' प्रकल्पासाठी झालेल्या सांमजस्य करारला स्थायी समितीच्या माहितीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन सदर प्रकल्पाचा कालावधी 4 वर्ष राहिल. या कार्यालयाच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 701</u>:– प्रभाग क्र. 17 ब अंतर्गत लालगंज गुजरी येथे सी.सी. पेव्हमेंट रस्त्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. दिपेश कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 41,48,000/– पेक्षा 26.91 टक्के कमी दराची रू. 30,31,773/– (रूपये तीस लक्ष एकतीस हजार सातशे त्र्यहत्तर) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यन्त सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 702:—** प्रभाग क्र ७ ब आदिवासी सोसायटी जयदुर्गा ले आऊट, कडू ले आऊट, मलवार ले आऊट, झिंगाबाई टाकळी येथे विविध ठिकाणी रोडचे डांबरीकरण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. आर. एम. गोपलाणी यांची निन्मतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा ३.९९% अधिक दराची निविदा रू. ३१,१२,८८३/— ( एकतीस लक्ष बारा हजार आठशे त्र्यांशी फक्त ) पैकी रू. ३०,००,०००/— पर्यंत काम करण्याचे अटीवर निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 703:—** प्रभाग क्र. २० अ पंजाबी लाईन येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ९ निविदांपैकी मे. आर. बी. केवलरमाणी यांची प्राकलनिय दरांपेक्षा १.२ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. २५,६८,७९६/— (अक्षरी पंचवीस लक्ष अडुसष्ठ हजार सातशे शहाण्णव रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 704:—** नागपूर शहरातील एकीकृत घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत तयार केलेले विस्तृत प्रकल्प अहवाल स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनुदान प्राप्त करण्याकरीता राज्यशासनाकडे सादर करावयाचे आहे. केन्द्रशासनाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मार्गदर्शन तक्ता डिसेंबर २०१४ मध्ये निर्गमित केले. त्या अनुषंगाने राज्यशासनाने १५ मे २०१५ ला काढलेल्या शासन निर्णयानुसार स्वच्छ महाराष्ट्र मिशन राबविण्याकरीता शहरांना घनकचरा व्यवस्थापण प्रकल्पांकरीता अनुदान (Viability Gap Funding) दयावयाचे आहे.

मा. उच्च न्यायालयात असलेली जनहीत याचिका क्र. ४४/२०११ व तसेच राष्ट्रीय हरीत लवाद, पूणे (NGT) application No. 32(THC)/2013(WZ) येथे देशपांडे लेआउट यांनी सादर केलेल्या तक्रारीवर वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे नागपूर महानगरपालिकेने तांत्रिक सल्लागार मेसर्स आर. जगताप ॲन्ड असोसिएट, नागपूर यांना अधिकृतपणे नियुक्ती, त्यांचे भूगतान तसेच त्यांच्यामार्फत तयार करण्यात आलेले एकूण प्रकल्प राशी रु. ३३९.०० कोटीच्या विस्तृत प्रकल्प अहवाल राज्यशासनापुढे सादर करण्याकरीता तसेच या संपूर्ण प्रक्रियेस मा. स्थायी समितीच्या मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन वित्तीय मान्यतेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच प्रस्तावित प्रकल्प पी.पी.पी. या तत्वावर असल्यामुळे यास म.न.पा. सभागृहाची मंजूरी आवश्यक आहे. असे स्थायी समितीचे मत आहे. करिता या प्रकरणात प्रशासनाने योग्य निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करावी असे निर्देश ही स्थायी समिती प्रशासनास देते.

**ठराव क्रमांक 705:—** प्रभाग क्र. ४६ ब जवाहर को.ऑप. हाऊसिंग सोसायटी येथे रस्त्याचे डांबरीकरणाच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. फोनिक्स इंजिनिअरींग यांची प्राकलनीय दरापेक्षा ३.५० टक्के अधिक दराची रु. ४०,८०,६५९/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 706</u>:— प्रभाग क्र. ४६ ब धन्वंतरी नगर, मिरे ले—आऊट व विनोबा गृह निर्माण सहकारी संस्था येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एल.सी.गुरुबक्षाणी यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.65 टक्के अधिक दराची रु. 36,37,980/— रकमेची निम्मनतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 707</u>:— प्रभाग क्र. ४६ प्रभुनगर येथे श्री. इंगळे ते श्री. वाघमारे आणि न्यु नंदनवन समोर मंझी लते हसनबाग रोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.95 टक्के अधिक दराची रु. 41,53,482/— रकमेची निम्मनतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 708</u>:— प्रभाग क्र. 67 ब सद्भावनानगर, स्वराजनगर येथील संत तुकडोजी महाराज सांस्कृतिक सभागृहाला जोडणारा रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण चे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. मुसळे डेव्हलपर्स यांची प्राकलनीय दरापेक्षा 28.86 टक्के कमी दराची रु. 32,41,375/— राशीची निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 709</u>:— प्रभाग क्र ७ अ ब ताजनगर, संत ज्ञानेश्वर सोसायटी ले आऊट, बंन्दू नगर, मलवार ले आऊट झिंगाबाई टाकळी येथिल रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. एस. के. गुरूबक्षाणी यांची निन्मतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५०% अधिक दराची निविदा राशी रू. ३०,९७,८९२/— ( तीस लक्ष सत्यानऊ हजार आठनशे ब्यानंऊ फक्त ) असल्याने मंजुर प्रावधाना पर्यंत म्हणजे रू. ३०,००,०००/— पर्यंत काम करण्याचे अटीवर निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 710</u>:— प्रभाग क्र. 28 अ मोमिनपुरा भानखेडा परिसर आणि अंसारनगर परिसर येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त 18 निविदांपैकी मे. रजा कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 29.03 प्रतिशत ने कमी दराची रु. 34,96,472/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 711</u>:— प्रभाग क्र. 5 ब अंतर्गत ठवरे कॉलोनी सिद्धार्थ नगर मध्ये आशीनगर येथील राजा आटा चक्की ते श्री. शेख नदिम यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकामास्तव तयार केलेल्या रु. 25,38,400/— रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 679 व नवीन पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 712**:— मौजा नरसाळा, नरसाळा गांव ते बेसा पावर हाउस पर्यंतच्या नागपूर शहर ते नरसाळा गावाला जोडणाऱ्या रस्त्यापैकी—महादेव फुलारे ते जिल्हापरिषद शाळा नरसाळा पर्यंतच्या रस्त्याचे खड्डे भरणे व डांबरीकरणाचे रू. १,१९,७३,२३२/— रकमेच्या कामास्तव सुधारित प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच या कामाचे निविदाकार मे. डि. सी.गुरबक्षानी, यांचे मंजूर दराने काम करून घेण्यास रू. ७,५१,७९८/— रकमेच्या कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन रू. ७,५१,७९८/— रकमेच्या अतिरिक्त कार्यादेश निर्गमित करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 713**:— हद्दवाढ झालेल्या क्षेत्रात पायाभूत सोई सुविधा निर्मिती करिता नागपूर महानगरपालिकेव्दारा सादर करण्यात आलेला नरसाळा या भागातील विविध ठिकाणी रस्ते दुरूस्ती व सुधारणा प्रकल्पाच्या कामास्तव रू. १७.४७ कोटी रकमेचा प्रस्तावास, महानगरपालिकेनी २० टक्के हिस्साची रक्कम रू. ३.४९ कोटी भरण्यास सहमती असल्याचा ठराव मंजूर करणे या अटीच्या अधीन राहून शासन हिश्श्याच्या रू. १३.९८ कोटी (८० टक्के) पैकी प्रथम हप्ता रक्कम रू ६.९९ कोटी मंजूर करण्यास मान्यता प्राप्त आहे. करिता नरसाळा या भागातील रस्ते सुधारणा प्रकल्पा करिता म.न.पा.च्या हिश्श्यापोटी (२० टक्के) रू. ३.४९ कोटी रकमेचा सहभाग पद क्र. A42001374602 अंर्गत उपलब्ध करून देण्याच्या शिफारशीसह प्रस्ताव महापालिका सभागृहासमक्ष ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 714** :— प्रभाग क्र. ४८ रेशीमबाग अंतर्गत डॉ. हेडगेवार स्मृति मंदिर परिसरातील रस्त्यांचे सिमेंटीकरण व पावसाळी नालीचे बांधकाम करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ८ निविदाकारा पैकी मे. आर्यमा इन्फ्रास्ट्रक्चर यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापैक्षा १.२५ टक्के कमी दराच्या निविदा राशी रू. ७०,१८,१०७/— रकमेच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 715** :— आरोग्य विभाग करीता रुग्णवाहिका (High Root Single Stretcher Ambulance With A.C.Unit) ०३ नग खरेदी करण्याकरिता रु. २९ लक्ष राशीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करणे व ई निविदा काढण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 716**:— नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोन कार्यालयामध्ये दैनंदिन कामाकरिता लागणाऱ्या संगणक कंझुमेबल्स व साहित्याच्या खरेदीसाठी दरकरार करण्याबाबत.

स्थायी समिती ठराव क्र. 365 दिनांक 28.12.2015 अन्वये उपरोक्त कामाकरिता ई—निविदा बोलावल्या असता प्राप्त चार निविदाधारक 1) मे. गॅलक्सी एंटरप्रायजेस, नागपूर 2) मे. सुदर्शन पेपर कन्व्हर्टींग वर्क्स, नागपूर 3) मे. पी ॲन्ड जी

सेल्स कार्पोरेशन, नागपूर 4) मे. गुरुकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिंटर्स, नागपूर या चार निविदा प्राप्त झाल्या. या चार निविदामधील निम्नतम दर करारासाठी विचारार्थ घेण्यात आले.

सबब उपरोक्त चार निविदाकारासोबत दरकरार करण्यास व यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. 100 लक्षाच्या वार्षिक खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तीन वर्षासाठी दर करार करण्यासह प्रति वर्ष रु. 100 लक्षाच्या खर्चास वित्तीय मान्यता देण्याच्या सुचनेसह प्रस्तावित विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 717</u>:— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉट विभागाद्वारे नागपूर शहरातील रस्त्याची दूरुस्ती व सूस्थीती करण्याकरीता लेबर पुरवठा करण्याकरीता मे. आर. बी. केवलरमानी यांची प्राकलनिय दरापेक्षा 31.77% कमी दराची रु. 47,76,100.00 राशीची निविदा स्वीकृत करुन निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 718</u>:— प्रभाग क्र. 2 कामगार नगर फार्मसी कॉलेज जवळ, मुस्लीम कब्रस्तानला सुरक्षा भिंत बांधण्याचे कामास्तव प्राप्त २० निविदांपैकी मे. दिपेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा २२.७१ प्रतिशत ने कमी दरांची रू. २०,९८,९१०/— (अक्षरी वीस लक्ष अठ्ठयाण्णव हजार नऊशे दहा रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 719</u>:— प्रभाग क्रं. ६२ म्हाळगीनगर अंतर्गत धनगवली नगर, चक्रपाणी नगर, शिवाजी सोसायटी, सुर्योदय नगर भागातील प्रथम चरण रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त २३ निविदाकारांपैकी मे. बाजोरीया इंटरप्रायजेस यांची (प्राकलनीय दरापेक्षा ३२.९९ टक्के कमी दराची रु. ३३,४९,२५८ /—) रकमेची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 720</u>:— नागपूर महानगरपालिका तथा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मर्या. मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २८ फेब्रुवारी ते २ मार्च २०१६ या कालावधित **"यशवंत स्टेडियम"** येथील मैदानावर **"नागपूर महोत्सव"** कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. स्थायी समिती ठराव क्र. ६७० दि. २२/०२/२०१६ प्रमाणे उपरोक्त कार्यक्रमाकरिता प्रशासकीय मान्यता व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. हा कार्यक्रम चार दिवस विविध कार्यक्रमासह आयोजित आहे. ते खालील प्रमाणे असून त्याकरीता या आयोजनांचा खर्च खालील प्रमाणे आहे.

दिनांक — २८/०२/२०१६ ⟶ लाईव्ह ईन कॉन्सर्ट ⟶ रू. ४५,८०,०००/—
(मोहित चौहान आणि ग्रुप)
दिनांक — २९/०२/२०१६ ⟶ कवी सम्मेलन ⟶ रू. १,८३,२००/—
(मुन्नवर राणा, अर्जुन सिसोदिया, गोविंद राठी,
रचना तिवारी सुदीप भोला, राजीव शर्मा)
दिनांक — ०१/०३/२०१६ ⟶ फ्युजन ⟶ रू. ४०,०७,५००/—
(सेल्वा गणेशा, निलांद्री कुमार, कार्तिक)
दिनांक — ०२/०३/२०१६ ⟶ "मराठी बाणा" ⟶ रू. २०,००,०००/—

(चौरंग, मुंबई)

उपरोक्त कार्यक्रम म.न.पा. नागपूर महोत्सव आयोजन समितीने निश्चित केले असून त्यावर खर्च दर्शविलेला आहे. त्याव्यतिरिक्त दिनांक २८/०२/२०१६ तथा दिनांक ०१/०३/२०१६ च्या कार्यक्रमातील कलाकार व संच मानधन त्यांचे जाणे–येणे खर्चाचे अधिकार संबंधित मुख्य कलाकार यांनी मे. वुई द वर्किंग इलिमेन्ट या संस्थेला दिलेले आहेत. ही रक्कम त्यांचे नावे द्यावी लागेल. या व्यतिरिक्त दिनांक २८/०२/२०१६ तथा दिनांक ०१/०३/२०१६ ला होणाऱ्या दोन कार्यक्रमातील कलाकार संच जाणे–येणे एकुण रू. ७,३८,९६५.८३ इतका सादर केलेला आहे. ही रक्कम सुध्दा मे. वुई द वर्किंग इलिमेन्ट या संस्थेला द्यावी लागेल. या व्यतिरिक्त या सर्व चारही कार्यक्रमातील कलाकार व संच राहणे व भोजन व्यवस्था करीता अतिरिक्त खर्च रु. १५ लक्ष अपेक्षीत आहे. उपरोक्त प्रस्ताव स्थायी समिती कडे वित्तीय भुगतान करण्यासाठी मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 721</u>:– नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज–II अंतर्गत, पॅकेज–2 अंतर्गतील रस्ता क्र. (2b) दक्षिण अंबाझरी रोड (भाग–2) माटे चौक ते अंबाझरी टी–पॉईंट पर्यंत, रस्ता क्र. (12) मंगलमुर्ती चौक ते शितलामाता मंदिर पर्यंत, रस्ता क्र. (23) आर.पी.टी.एस. रोड–माधव नगर चौक ते वेस्ट हायकोर्ट रोड पर्यंत हा रस्ता सिमेंट कॉक्रिट चा तयार करण्याकरीता अर्हता प्राप्त 03 निविदापैकी मे. अभि इंजिनियरींग कॉर्पोरेशन, नागपूर यांची वाटाघाटी अंती सुधारीत प्राकलनीय दरांपेक्षा 12.61 कमी दराची रू. 17,46,49,389/– रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन

1. मे. अभि. इंजिनियरींग कार्पोरेशन ही भागीदारी फर्म दि. 16.09.2013 पासून होती. 2014 पासून सदर फर्म कंपनी म्हणून मे. अभि. इंजिनियरींग कार्पोरेशन म्हणून रुपांतरीत झाली आहे.
2. मात्र त्यांनी याच समप्रकारचे कार्यकंत्राट मे. अभि इंजिनियरींग कार्पोरेशन या नावाने भागीदारी संस्था असतांनाचे अनुभव प्राप्तीचे कार्यादेश जोडले आहे. मात्र भागीदारी संस्था बरखास्त (Dissolved) झाल्याचे कागदपत्र कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सादर केला आहे.

   अशा परिस्थितीत मे. अभि. इंजिनियरींग कार्पोरेशन प्रा.लि. ही कंपनी म.न.पा.तर्फे नमूद केलेल्या अटी व शर्तीची पूर्ती करते किंवा कसे याची खातरजमा व सत्यापन करावे.
3. त्याचप्रमाणे कार्यालयास प्राप्त झालेले पत्र क्र. ईईसी/सीसीसी/के' खेडा/टेक/00209 दि. 24.02.2016 पत्राच्या अनुषंगाने निविदाकाराने समप्रकारचे कामाचा तपशील (पूर्वोत्त अनुभव म्हणून) निविदा भरतांना सादर केलेला आहे. तो ही कार्यादेश व पारित देयक पडताळून सत्यापित करण्यात यावा.
4. उप कंत्राटदार म्हणून प्राप्त कामाचा अनुभव हा कंत्राटाचा अनुभव होऊ शकत नाही व निविदा भरतांना निविदाकाराचा हा अनुभव विचारात घेता येणार नाही असे यास स्थायी समितीचे मत आहे.

करीता या सर्व बाबींचा खुलासा करावा या सूचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 722</u>:– नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज–II अंतर्गत, पॅकेज–1 अंतर्गतील दक्षिण अंबाझरी रोड – वर्धा रोड वरील रहाटे कॉलनी टी. पॉईन्ट ते माटे चौकापर्यंत (भाग–1) हा रस्ता सिमेंट कॉक्रिट चा तयार करण्याकरीता अर्हता प्राप्त 4 निविदापैकी मे. अभि इंजिनियरींग कॉर्पोरेशन, नागपूर यांची वाटाघाटी अंती सुधारीत प्राकलनीय दरांपेक्षा 11.96% कमी दराची रू. 11,69,39,409/– रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन

1. मे. अभि. इंजिनियरींग कार्पोरेशन ही भागीदारी फर्म दि. 16.09.2013 पासून होती. 2014 पासून सदर फर्म कंपनी म्हणून मे. अभि. इंजिनियरींग कार्पोरेशन म्हणून रुपांतरीत झाली आहे.
2. मात्र त्यांनी याच समप्रकारचे कार्यकंत्राट मे. अभि इंजिनियरींग कार्पोरेशन या नावाने भागीदारी संस्था असतांनाचे अनुभव प्राप्तीचे कार्यादेश जोडले आहे. मात्र भागीदारी संस्था बरखास्त (Dissolved) झाल्याचे कागदपत्र कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सादर केला आहे.

   अशा परिस्थितीत मे. अभि. इंजिनियरींग कार्पोरेशन प्रा.लि. ही कंपनी म.न.पा.तर्फे नमूद केलेल्या अटी व शर्तीची पूर्ती करते किंवा कसे याची खातरजमा व सत्यापन करावे.
3. त्याचप्रमाणे कार्यालयास प्राप्त झालेले पत्र क्र. ईईसी/सीसीसी/के' खेडा/टेक/00209 दि. 24.02.2016 पत्राच्या अनुषंगाने निविदाकाराने समप्रकारचे कामाचा जो तपशील (पूर्वोत्त अनुभव म्हणून) निविदा भरतांना सादर केला आहे. तो ही कार्यादेश व पारित देयक पडताळून सत्यापित करण्यात यावा.
4. उप कंत्राटदार म्हणून प्राप्त कामाचा अनुभव हा कंत्राटाचा अनुभव होऊ शकत नाही व निविदा भरतांना निविदाकाराचा हा अनुभव विचारात घेता येणार नाही असे यास स्थायी समितीचे मत आहे.

करीता या सर्व बाबींचा खुलासा करावा या सूचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 723</u>:– नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज–II अंतर्गत, पॅकेज–4 मधील वेस्ट हायकोर्ट रोड – सेमीनरी हिल्स जपानी गार्डन चौक ते एम.एल.ए. हॉस्टेल ते लॉ कॉलेज आणि लक्ष्मी भवन चौक ते शंकरनगर चौकापर्यंत सिमेंट कॉक्रिट रस्ता करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. जे. पी. इंटरप्रायजेस यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा 4.6 प्रतिशत कमी दराची रू. 134407594/– दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 724</u>:– नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज–II अंतर्गत, पॅकेज–11 अंतर्गतील रस्ता क्र. 07–गुरूदेव नगर चौक ते उमरेड रोड भांडे प्लॉट चौक ते छोटा ताजबाग टी पॉईंट पर्यंत, रस्ता क्र. 09–गुरूदेव नगर ते ईश्वर नगर चौक पर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रिट चा तयार करण्याकरीता अर्हता प्राप्त 04 निविदापैकी मे. डि.पी.जैन ॲन्ड कंपनी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ॲन्ड खळतकर कन्स्ट्रक्शन (J.V.) यांची वाटाघाटी अंती सुधारीत प्राकलनीय दरांपेक्षा 9.20 कमी दराची रू. 11,85,51,811/– रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 725**:— नागपूर शहराकरीता सिमेंट कॉंक्रिट रोड फेज—II अंतर्गत, पॅकेज—20 अंतर्गतील रस्ता क्र. 17—रिंग रोड—सीएमपीडीआय पासुन ते भीम चौक ते पाटनकर चौक पर्यंत, रस्ता क्र. 35—पाचपावली पोलीस स्टेशन पासून ते एन.आय.टी डिव्हीजन ऑफीस पर्यंत, रस्ता क्र. 42—महात्मा फुले शाळा संत्रा मार्केट रोड पासुन ते कामठी रोड अशोक चौकापर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रिट चा तयार करण्याकरीता अर्हता प्राप्त 03 निविदापैकी मे. आर.एम.दयारमानी यांची वाटाघाटी अंती सुधारीत प्राकलनीय दरांपेक्षा 8.00 टक्के कमी दराची रू. 14,67,59,633/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 726**:— प्रभाग क्र. 39 ब ढिवरपूरा तेलीपूरा, नबाबपूरा गरूड खांब येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त 19 निविदापैकी मे. जी. बी. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेंक्षा 22.06 टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. 23,37,625/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 727**:— नागपूर शहरातील विविध उद्यानात ग्रिन जिम लावण्याच्या कामाकरीता रू. 39,99,980/— च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास तसेच हे काम निविदा मागवून करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 728** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर